# वागळे वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


## पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २९८ /२०२५ — दि. १८/०९/२०२५

### –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** वागळे वाहतुक उपविभागाचे हद्दीत दि. २२/०९/२०२५ ते दि.०२/१०/२०२५ या कालावधीत **संकल्प चौक** या ठिकाणी **'नवरात्रौत्सव'** निमित्ताने **'रासरंग गरबा'** चे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाकरीता अति महत्वाच्या व्यक्ती मोठया प्रमाणात उपस्थित राहणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** **१)** जुना पासपोर्ट ऑफिस कडुन संकल्प चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जिलानेवाडी, अर्जुन बिल्डीग** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने ही जिलानेवाडी, अर्जुना पार्क बिल्डीग येथुन डावीकडे वळुन हाजुरी चौकातुन इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** **२)** संकल्प चौकाकडुन रहेजा कडे जाणाऱ्या तसेच रहेजा कडुन संकल्प चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **रहेजा कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** **अ)** संकल्प चौकातुन रहेजाकडे जाण्यासाठी हाजुरी, जुनापासपोर्ट मार्गे डावीकडे वळण घेवुन इच्छित स्थळी जातील.

**ब)** रहेजा चौकातुन संकल्प चौकाकडे जाण्यासाठी तिनहात नाक्यामार्गे साईमास हॉटेल कडुन डावीकडे वळुन गुरुकुल स्कुल येथुन उजवीकडे वळुन पुढे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दि.२२/०९/२०२५ रोजी ते दि. ०२/१०/२०२५ रोजी सायंकाळी १७.०० वा. ते रात्रौ २२.०० वाजेपावेता अंमलात राहील.

सदरची अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय,ठाणे

२/– सदरची अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

– जिल्हाधिकारी, ठाणे
– आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
– अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त,परिमंडळ–५, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
– परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका ,ठाणे.
– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
– नियंत्रण कक्ष,ठाणे शहर
– ठाणे पोलीस पत्रक

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.

स.पो.आ. ठाणे वाहतुक विभाग,/पोनि वागळे, नौपाडा, वाहतूक उपविभाग.